महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५,

मुंबई, दिनांक २८/०२/२०२५.

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र. सीसीटी २६१५/प्र.क्र२०८/भाग-१/पोल-३ दि.२८फेब्रुवारी २०२५

**विषय :-** नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत.

*******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र. सीसीटी २६१५/प्र.क्र२०८/भाग-१/पोल-३ दि.२८फेब्रुवारी २०२५,ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०२२७१७२४५८१५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, नागपूर शहर

कार्यासन अधिकारी,का.क्र.३३

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन ) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी
उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सीसीटी २६१५/प्र.क्र.२०८/भाग-१/पोल-३**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : २७.२.२०२५**

वाचा :-

१. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक २७.०६.२०१६ च्या बैठकीचे इतिवृत्त.
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) क्र.डीआयटी१७१६/प्र.क्र.४६९/३९,दि.२६.१२.२०१६.
३. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्र. जीएडी-मातंस ०८७/०५/ २०१६-डीआयआर-डीआयटी (एमएच), दिनांक ११.०७.२०१६ व दिनांक ३०.०८.२०१६.
४. नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत मे. लार्सन अँड टुब्रो लि.या कंपनीस दिलेले दिनांक १५.०८.२०१६ रोजीचे इरादापत्र.
५. नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ व मे.लार्सन अँड टुब्रो लि. यांच्या दरम्यान दि.१८.१०.२०१६ रोजी झालेला करारनामा.
६. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७.०४.२०१५.
७. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि.१८.०४.२०१७.
८. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.३६/पोल-३,दि.०९.०१.२०१७.
९. शासन आदेश, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) क्र. जीएडी-मातंस ०८७/०५/ २०१६/३९, दि.२.२.२०१८.
१०. नागपूर सेफ अँड स्मार्ट सिटी (Smart and Safe City) प्रकल्पाबाबत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाचे दि.२२.०४.२०२१ रोजीचे पत्र.
११. संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय,मुंबई यांचे दि.०९.०७.२०२१ रोजीचे उपयोगिता प्रमाणपत्र.
१२. पोलीस उप आयुक्त, वाहतूक, नागपूर शहर यांचे पत्र क्र.पोउपआ/वावि/नाग/युजर सर्टिफिकेट/ २०२१, दि.१०.०७.२०२१.
१३. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर Civil Application ST.No.७५१७ of २०२१ वरील दि.०१.०७.२०२१ रोजीचे आदेश.
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांचे पत्र क्र. Ref No.MH-IT/OW/ ०४२३/००८११,दि.१२.४.२०२३ व Ref No. MH-IT/OW/०६२३/२२६,दि.२३.६.२०२३

प्रस्तावना :-

नागपूर सेफ व स्मार्ट सिटी (Safe and Smart City) प्रकल्प माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या प्रकल्पास मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पांतर्गत शहरात सीसीटीव्ही संनिरीक्षण प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचा सेफ सिटी (सीसीटीव्ही) हा भाग गृह विभागाशी संबंधित असल्याने या प्रकल्पासाठी

सन २०१६-२०१७ ते सन २०२२-२०२३ या कालावधीकरीता आवश्यक असलेल्या एकण रु.१७३.८९ कोटी इतक्या निधीची तरतूद गृह विभागाने करावी, अशी विनंती माहिती व तंत्रज्ञान विभागाने दि.३०.०८.२०१६ च्या पत्रान्वये केली असून खाली दर्शविल्याप्रमाणे रक्कम अदा करणेबाबत कळविले आहे :-

| **Financial Year** | **Funding requirement from Home Department (Rs. In Crore)** |
|---|---|
| 2016-17 | 34.78 |
| 2017-18 | 60.86 |
| 2018-19 | 17.39 |
| 2019-20 | 17.39 |
| 2020-21 | 17.39 |
| 2021-22 | 17.39 |
| 2022-23 | 8.69 |
| **Total** | **173.89** |

त्यापैकी शासन निर्णय, गृह विभाग दि.३१.०३.२०१७ अन्वये रु.१० कोटी इतका निधी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळास, शासन निर्णय, गृह विभाग दि.२७.०२.२०१८ अन्वये रु.७५ कोटी इतका निधी माहिती व तंत्रज्ञान विभागास, शासन निर्णय, गृह विभाग दि.१९.०३.२०१९ अन्वये राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरिता महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळास वितरीत केलेला रु.२१ कोटी इतका निधी दि.०७.०८.२०२० च्या शासन पत्रान्वये नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी खर्च करण्याची अनुमती देण्यात आली. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांच्या दि.०१.०७.२०२१ रोजीच्या आदेशानुसार शासन निर्णय, गृह विभाग दि.२३.०७.२०२१ अन्वये रु.४१.८१ कोटी इतकी रक्कम माहिती व तंत्रज्ञान विभागास वितरीत करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.११ अन्वये दि.०९.०७.२०२१ रोजी संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई यांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच संदर्भ क्र.१२ येथील दि.१०.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पोलीस उप आयुक्त, वाहतूक, नागपूर शहर यांनी वापरकर्ता प्रमाणपत्र (User Certificate) सादर केले आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाने दि.२२.०४.२०२१ च्या पत्रान्वये उर्वरित निधी अदा करण्याची विनंती केली आहे. सदर्भ क्र. १४ येथील दि.१२.४.२०२३ च्या पत्रान्वये व्यवस्थापकीय संचालक,माहिती तंत्रज्ञान महामंडळ लि. यांनी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. तसेच उर्वरीत निधी अदा करण्याची विनंती केली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने तसेच संदर्भ क्र.१३ येथील मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांच्या दि.०१.०७.२०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने नागपूर सेफ व स्मार्ट सिटी (Safe and Smart City)

प्रकल्पांतर्गत नागपूर शहरात राबविण्यात येत असलेल्या सीसीटीव्ही संनिरीक्षण प्रकल्पाकरीता उर्वरित रु.२५,१९,००,०००/- इतकी रक्कम माहिती व तंत्रज्ञान विभागास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

नागपूर सेफ व स्मार्ट सीटी (Safe and Smart City) प्रकल्पांतर्गत नागपूर शहरात राबविण्यात येत असलेल्या सीसीटीव्ही संनिरीक्षण प्रकल्पाकरीता उर्वरित रु.२५,१९,००,०००/- (रुपये पंचवीस कोटी एकोणीस लाख फक्त) इतकी रक्कम माहिती व तंत्रज्ञान विभागास वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा "मागणी क्र.बी-१०, ४०५५ -पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदरचा निधी माहिती व तंत्रज्ञान विभागास BEAMS वर उपलब्ध करुन देण्यात यावा. सदर निधी वितरीत करण्यासाठी संचालक माहिती व तंत्रज्ञान, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांनी सदरचा निधी कोषागारातून आहरित करावा व सदर निधी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळास द्यावा. नागपूर सेफ ॲड स्मार्ट सीटी प्रकल्पाबाबत केलेल्या करारातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करत असल्याची खात्री करावी. तसेच याबाबत काही लेखा आक्षेप व काही आर्थिक बाबी उपस्थित झाल्यास त्याची पूर्तता करण्याची जबाबदारी माहिती व तंत्रज्ञान विभागाची राहील.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ ला अनुसरुन प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारान्वये तसेच विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला,उपविभाग-दोन,महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अनु.क्र.२७-अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदान

समितीच्या दि.२७.६.२०१६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२४/प्र.क्र.८०/अर्थ-३,दि.२५.७.२०२४ अनुसार अनौपचारिक संदर्भ क्र. ४१/२०२५/व्यय-७, दि.२०.१.२०२५ अन्वये सन २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या प्रथम नऊ महिन्यांकरिता (डिसेंबर,२०२४ अखेर) खर्च भागविण्यासाठी विधानमंडळाने महाराष्ट्र विनियोजन विधेयक,२०२४ द्वारे अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०२२७१७२४५८१५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148cca a24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6C DFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2025.02.27 17:27:02 +05'30'

**(रा.ता.भालवणे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. पोलीस आयुक्त, नागपूर शहर.
१२. महालेखालपाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१३. महालेखालपाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. वित्त विभाग (व्यय-७/वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई.
१७. कक्ष अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवडनस्ती, पोल-३.

**********